# बीसीए कॉलेजमध्ये मराठी भाषा दिन

**सातारा : पुढारी वृत्तसेवा**

येथील कॉलेज ऑफ कॉम्प्युटर ॲप्लीकेशन फॉर वुमेन येथील ग्रंथालय विभाग व एनएसएस विभागाच्यावतीने मराठी भाषादिन प्रा. अविनाश मोहिते यांच्या प्रमुख उपस्थितीत व प्राचार्य डॉ. समिक्षा निकम यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात साजरा करण्यात आला. प्रा. अविनाश मोहिते यांनी अलीकडच्या युगातील मराठी भाषेची परंपरा व वारसा, मराठी प्रादेशिक बोलींमधील फरक तसेच वाचनातून व्यक्तीमत्व विकासाचे महत्व याची माहिती दिली. वाचनाची आवड निर्माण व्हावी व प्रेरणा मिळावी याबाबतही मार्गदर्शन केले. यावेळी आशा उथळे, डॉ. कल्याणी बारटक्के, प्रा. राजश्री निकम, पूज्ञा जाधव व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.